दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..

• वर्ष १६ वे • अंक २७९ • MAHMAR/2006/17212 • रायगड • सोमवार दि.३ जानेवारी २०२२ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com


## दोन वेगवेगळ्या अपघातात एक ठार तीन जखमी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल परिसरात झालेल्या दोन वेगवेगळ्या अपघातात एक ठार तर तीन जण जखमी झाल्याची घटना घडली आहे.

पनवेल जवळील साईदिप हॉटेलजवळून फिर्यादी सस्मीत डोके (वय–३५, रा.–डेरवली) हा शिवनाथ साह (वय–३४, रा.–एपीएमसी मार्केट) हे दोघे दुचाकीवरून पनवेल बस डेपो बाजूकडे येत असताना अचानक पाठीमागून भरधाव वेगाने आलेल्या सफेद रंगाच्या कारवरील चालकाने त्यांच्या गाडीस धडक दिल्याने यात ते दोघे जखमी होऊन या अपघातात शिवनाथ साह याचा मृत्यु झाला आहे. सदर घटनेनंतर कारचालक कारसह पळून गेला आहे. या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. तर दुसऱ्या घटनेत खांदा वसाहत येथील नवीन पनवेल ते खांदा कॉलनी ओव्हर ब्रीजवरून फिर्यादी स्वाती दास (वय–५५) या रिक्षाचालक विकी गायकवाड (वय–२८) याच्या रिक्षातून जात असताना पुढे चाललेल्या डंपरला रिक्षाने पाठीमागून धडक दिल्याने झालेल्या अपघातात हे दोघे जखमी झाले असून रिक्षाचेही नुकसान झाले आहे.

# पनवेल, कळंबोली वाहतूक शाखेच्या अनधिकृत टोईंग व्हॅन बंद करा

**दै.रायगड नगरी । अरविंद पोतदार**

**पनवेल** : सर्व सामान्य नागरीकांना वाहतुक सुरळीत रहावी एखादा अपघात झाल्यास तात्काळ वाहतुक सुरळीत व्हावी या करीता टोईंग व्हॅन वापरल्या जातात. तसेच हायवेवर अपघात झाल्यास अपघातग्रस्त वाहने बाजूला करण्याकरिता टोईंग व्हॅन यांचा वापर केला जातो.

परंतु कळंबोली व पनवेल येथील वाहतुक विभागात अनधिकृत टोईंग व्हॅनने शिरकाव केल्याने सर्व सामान्य नागरीकांच्या खीशावर या टोईंग व्हॅनच्या टोळीचे लक्ष असल्याचे जाणवते. कळंबोली पोलीस चौकी तसेच पनवेल शहरातील शिवाजी चौक, नविन पनवेल येथील शिवा कॉम्लेक्स येथिल पोलीस चौकी या परीसरात या अनाधिकृत टोईंग व्हॅनने वाहने उचलण्याचा सपाटा सुरू केला आहे. नागरीकांच्या गाड्या दिवसभरात उचलायच्या वरील चौकीत जमा करायच्या, गाड्या उचलताना संबधीत गाडी जेथुन उचलली आहे तेथे कोणताही भ्रमणध्वनीची नोंद हे टोईंग न करताच वाहन चालकांमध्ये संभ्रमता निर्माण करतात. वाहन चालकाची गाडी चोरीला गेली की टोईंग व्हॅनने नेली अशा द्विधा मनस्थितीत वाहन चालक इकडे तिकडे आपली गाडी शोधत असतात. काही कालावधीनंतर आपली गाडी चौकीमध्ये नेल्याचे इतर नागरिकांकडून त्यांना समजते. वरील बहुतांश चौकीत या गाड्या जमा केल्या जातात. तेथे गेल्यावर मोठ्या दंडाची भीती दाखवुन दिवसाकाठी रोख लाखोची वाहनचालकांकडुन वसुली मोहीम टोईंग व्हॅनच्या मदतीने धुमधडाक्यात पनवेल शहरात सुरू आहे.




### नागरिकांची मागणी

त्यातच चार चाकी वाहनांना देखील व्हील लॉक लावुन देखील वाहतुक पोलीसांच्या माध्यमातुन सर्व सामान्य नागरीकांची अक्षरशा लुट सुरू असल्याने या अनाधिकृत टोईंग व्हॅन त्वरित बंद करण्यात याव्यात अशी मागणी नागरीकांतुन होत आहे. कर्तव्यदक्ष पोलीस आयुक्त यांनी वेळीच लक्ष घालून नागरिकांना डोकेदुखी ठरलेल्या या अनधिकृत टोईंग व्हॅन त्वरित बंद कराव्यात अशी मागणी नागरिकांतून होत आहे.



पनवेल शहर पोलिसांच्या चौकीत होतेय वाहतूक पोलिसांची गब्बर वसुली

# पनवेल उपजिल्हा रुग्णालयात डायलिसिस सेंटरचे ना.आदिती तटकरे यांच्या हस्ते उद्घाटन

### विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांच्या पाठपुराव्याला यश



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल येथील तीर्थरूप आदरणीय नानासाहेब धर्माधिकारी उपजिल्हा रुग्णालयात डायलिसिस सेंटर सुरू करावे अशी मागणी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली नगरसेविका प्रीती जॉर्ज, डॉ.सुरेखा मोहोकर,सारिका भगत आणि पनवेल महानगरपालिके मधील महाविकास आघाडीच्या नगरसेवकांनी केली होती. डायलिसिस सेंटर आणि ब्लड स्टोरेज युनिट चे आज पालकमंत्री नामदार कु. आदितीताई तटकरे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

> आमच्या आरोग्य विषयक मागणीत जलद निर्णय घेऊन पालकमंत्र्यांनी त्वरित कार्यवाही केली आणि पनवेल येथे डायलिसिस केंद्र सुरू करण्यास प्राधान्य दिले त्याबद्दल त्यांचे महाविकास आघाडी पनवेलच्या वतीने मनापासून आभार.
>
> **प्रितम म्हात्रे (विरोधी पक्षनेते, पनवेल महानगरपालिका)**

या कार्यक्रमाला पालकमंत्री ना.आदितीताई तटकरे यांच्यासह काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष आर. सी.घरत, राष्ट्रवादी काँग्रेस सरचिटणीस प्रशांत पाटील, विरोधी पक्ष नेता प्रितम म्हात्रे, शेकाप जिल्हा चिटणीस गणेश कडू, राष्ट्रवादी काँग्रेस नेते सतीश पाटील, शिवदास कांबळे, सुदाम पाटील नगरसेवक गोपाळ भगत, रवींद्र भगत, डॉ.सुरेखा मोहोकर, सौ. प्रीती जॉर्ज, सौ.सारिका भगत, मा.नगराध्यक्ष सुनील मोहोड, मा.उपनगराध्यक्ष गणेश म्हात्रे, मा.नगरसेवक डी.पी.म्हात्रे, पनवेल अर्बन बँक संचालिका श्रीमती.माधुरी गोसावी, काँग्रेस नेत्या सौ.निर्मला म्हात्रे, सौ.शशिकला सिंग, ताहीर पटेल, विजय पाटील, विजय भोईर, तहसिलदार विजय तळेकर, सिव्हिल सर्जन डॉ.सुहास माने, उपजिल्हा रुग्णालय वैद्यकीय अधीक्षक डॉ.सचिन संकपाळ, पालिका वैद्यकीय अधिकारी डॉ.आनंद गोसावी, डॉ.बॉईटे, डॉ.प्रमोद पाटील, डॉ.सुरेश पंडित, डॉ.अरुणा मॅडम तसेच कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते. डायलेसिस करण्याचा खर्च हा सामान्य नागरिकाच्या आवाक्या बाहेर आहे जर सेंटर सुरू झाले तर त्याचा लाभ पनवेल मधीलच नाही तर पनवेलच्या आजूबाजूच्या तालुक्यातील नागरिकांना होणार आहे. .../२

# भाताणमध्ये नळ पाणीपुरवठा योजनेच्या कामाचे आ.प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते भूमिपूजन



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या स्वप्नातील जलजीवन मिशन अंतर्गत 'हर घर नल, हर घर जल'नुसार भाताण गावात ७१ लाख ५७ हजार रुपयांची नळ पाणीपुरवठा योजना राबविण्यात येत असून या विकासकामाचे भूमिपूजन भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते शनिवारी (दि. १) करण्यात आले.

भूमिपूजनाच्या वेळी आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, भाताण गावात सुरू झालेल्या या नळ पाणीपुरवठा योजनेचे काम पाहण्यासाठी जिल्ह्यातून लोक आली पाहिजेत असे काम करा. जलजीवन मिशन अंतर्गत सुरू झालेल्या या योजनेमुळे भाताण आणि परिसरातील नागरिकांना स्वच्छ आणि शुद्ध पाणी देण्याचा संकल्प लवकरच पूर्ण होईल.

कोरोनाच्या वाढत्या रुग्णसंख्येबाबत सांगताना कोरोना प्रतिबंधात्मक नियम पाळून नागरिकांनी आरोग्याची काळजी घ्यावी, असे आवाहन आमदार प्रशांत ठाकूर यांनी या वेळी केले. तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यामुळे कोरोना लस आपल्या देशात तयार .../२

# ना.आदिती तटकरे यांच्या उपस्थितीत असंख्य कार्यकर्त्यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश



**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यात बोकडवीरा येथे द्रोणागिरी स्पोर्ट्स असोसिएशनच्या २१ व्या युवा महोत्सवाचे उदघाटन दि २/१/२०२२ रोजी रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री आदितीताई तटकरे यांच्या हस्ते करण्यात आले. दिनांक २/१/२०२२ रोजी आदितीताई तटकरे यांच्या उरण तालुका दौऱ्या निमित्त विविध कार्यक्रमांचे उदघाटन करणे, नागरी समस्या जाणून घेणे तसेच पक्ष प्रवेश सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

ठरलेल्या दौऱ्या प्रमाणे माजी जिल्हा परिषद सदस्य वैजनाथ ठाकूर, विद्यमान जिल्हा परिषद सदस्य कुंदा ठाकूर यांच्या शिफारशी नुसार प्राथमिक आरोग्य केंद्र दिघोडे येथील जागेची पाहणी आदितीताई तटकरे यांनी केली. तदनंतर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे रायगड जिल्हा उपाध्यक्ष भार्गव पाटील यांच्या विनंतीनुसार राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे पागोटे कार्यालयाचे उदघाटन आदितीताईनी केले. तर मागासवर्गीय सेल राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी उरण अध्यक्ष मंगेश कांबळे यांच्या शिफारशीनुसार उरण बेलापूर टॅक्षी संघटना चारफाटा उरण येथे बोर्डाचे अनावरण, तसेच जे एन पी टी पुनर्वसित कोळीवाडा येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या बोर्डाचे अनावरण आदितीताईच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उरण दौऱ्यात अनेक शेकडो कार्यकर्त्यांनी महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस प्रशांत पाटील व पालकमंत्री .../२

# म्हसळा तालुक्यात होत असलेले रस्त्यांचे बांधकाम हे पर्यटन आणि विकास वाढीच्या दृष्टीने उपयोगी ठरणारे : खा.सुनिल तटकरे

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

म्हसळा तालुक्यातुन श्रीवर्धन, हरिहरेश्वर, दिवेआगर कडे पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी दळणवळणाचे महत्त्व लक्षात घेता म्हसळा तालुका हे प्रवेशद्वार आहे. म्हसळा तालुक्यातुन जाणारे आणि नव्याने विकसित होणारे माणगाव दिघी पुणे राज्य मार्ग, गोरेगाव श्रीवर्धन राज्य मार्ग, आंबेत बागमांडले रस्ता आता नव्याने होणारा लेप–कणघर– वावे रस्ता विकासाकरिता ४ कोटींचा निधीची मंजुरी मिळाली आहे. म्हसळा तालुक्यात होत असलेले रस्त्यांचे बांधकाम भविष्यात अधिक पर्यटन आणि विकास वाढीचे दृष्ट्या उपयोगी असल्याचे मत खासदार सुनिल तटकरे यांनी कणघर येथे ५०५४ मार्ग व पुल ०३ राज्य मार्ग लेखा शिर्ष सार्वजनिक बांधकाम विभाग महाराष्ट्र राज्य लेप कणघर वावे मार्गाचे भूमिपूजन कार्यक्रमाला व्यक्त करताना केले.



या वेळी त्यांच्या समावेत पक्षाचे जेष्ठ नेते अलिशेठ कौचाली, तालुका अध्यक्ष समीर बनकर, ता.मुंबई अध्यक्ष महेश शिर्के, जिल्हा परिषदेचे कृषी सभापती बबन मनवे, पं.स.सभापती छाया म्हात्रे, उप सभापती संदीप चाचले, स.सदस्या उज्वला सावंत, संतोष सावंत, कुणबी समाज नेते अंकुश खडस, माजी सभापती अंनिता खडस, महिला अध्यक्षा रेश्मा काणसे, अनिल बसवत, जयंत चिबडे, सतीश शिगवण, किरण पालांडे, सरपंच फारूक हजवाणे, अनिल जोशी, सचिन विचारे, डांगे, आदी मान्यवर उपस्थित होते. म्हसळा तालुका नैसर्गिक साधन संपत्तीने नटलेला असुन येथील दुर्गम डोंगर भागातील निसर्गाचे समतोल राखुन पर्यटनाचा केंद्र बिंदु करण्याचा मानस असल्याचे मनोदय व्यक्त केले. तालुक्यातील सर्व गावातील पिण्याच्या पाण्याचा दुर्मिक्ष संपविण्यासाठी जलजीवन मिशन योजना प्रभावीपणे राबविण्यात येवुन नियोजन बद्द आराखडा तयार करण्यासाठी या योजनेच्या प्रमुख पालकमंत्री आदिती तटकरे यांचे मार्गदर्शन घेऊन स्थानिक लोकप्रतिनिधी व संबंधित योजनेचे अधिकारी यांना सुचित करण्यात आले. लेप कणघर राज्य मार्ग मंजूर करण्याकामी महाविकास आघाडी सरकार मधील सार्वजनिक बांधकाम मंत्री अशोकराव चव्हाण यांच्या माध्यमातून सदर रस्त्याचे कामासाठी ४ कोटी रुपयांची मंजुरी मिळवुन घेतली अधिकच्या ३ किमी रस्ता बांधकाम करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी

# उद्योजक मंगेश परुळेकर यांना पत्नी शोक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहरातील उद्योजक, बांधकाम व्यावसायिक व ओरियन मॉलचे डायरेक्टर मंगेश परुळेकर यांच्या पत्नीचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले आहे.

मानसी मंगेश परुळेकर यांचे ३१ डिसेंबर २०२१ रोजी सायंकाळी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले आहे. शहरातील मिडलक्लास हौसिंग सोसायटी येथून अंत्ययात्रा काढण्यात आली होती व अमरधाम स्मशानभूमी येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी आ.प्रशांत ठाकूर, मा.नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, उद्योजक राजू गुप्ते, संजय पोतदार, प्रशांत पोतदार, अरविंद सावळेकर, किरण मनोरे, दांडेकर, प्रशांत झुंझारराव, मा.नगरसेवक अनिलकुमार कुळकर्णी, मा.नगरसेवक श्रीनंद पटवर्धन, राजू प्रधान, उद्योजक प्रशांत ठाकूर, मा.शहरप्रमुख सुनीत ठक्कर, छोटु हनुमंते, मिलींद पोटे आदींसह अनेक राजकीय पुढारी, मित्र परिवार व व्यावसायिक तसेच परुळेकर कुटुंबिय उपस्थित होते. त्यांच्या पश्चात त्यांचे पती, मुलगा, मुलगी, जावई असा परिवार आहे. दरम्यान परुळेकर कुटुंबियांच्या वतीने सर्वांनी विनंती करण्यात आली आहे की, कोरोना विषाणू संक्रमण पुन्हा वाढत असल्याने निर्बंध येवू घातले आहेत. त्यामुळे मंगेश, सौ.मनांकी किंवा चि.मनन यांचे सांत्वन करण्यासाठी व्यक्तीशः भेट घेण्याचे टाळावे.



# मातीतली नवाक्षरे

साहित्य क्षेत्रातला किंवा इतर कोणताही पुरस्कार देताना, आपल्या समाजात आजवर केलेल्या कामगिरीचे कौतुक, असा विचार होत असतो; त्यामुळेच बहुतेक पुरस्कारांचे वर्णन जीवनगौरव असे होते आणि हा जीवनगौरव होतो, तेव्हा बहुधा संध्याछाया पडू लागलेल्या असतात. तरुणांना पुरस्कार देण्यात दोन-तीन धोके समाजमनाला वाटत असावेत. आज पुरस्कार दिला आणि उद्या गाडी रुळावरून घसरली तर? किंवा, तरुणपणीच पुरस्कार मिळाल्यावर संबंधित व्यक्ती शेफारून तर जाणार नाही ना, ही आशंका. यामुळेच, आपण लेखक, कलावंत, चित्रकार, अभिनेते, गायक, संगीतकार यांच्या पाठीवर कौतुकाची, जिव्हाळ्याची थाप मारायला फार उशीर करतो. यंदाचे साहित्य अकादमीचे पुरस्कार याला अपवाद ठरले आहेत, ही फार आनंदाची आणि पुढे जाऊन तिची वहिवाट व्हावी, अशी बाब आहे. आता प्रत्येक भाषेतील चार पुरस्कार दर वर्षी दिले जातात. त्यातला एक युवा पुरस्कार असतो; त्यामुळे तो तरुणांनाच मिळणार. याशिवाय, अनुवादाचा, मुख्य आणि बालसाहित्याचा असे तीन पुरस्कार दर वर्षी आता दिले जातात. हे पुरस्कार अनेकदा ज्येष्ठांना मिळतात. त्यांचाही मान असतो आणि त्यांचा गौरवही व्हायलाच हवा; मात्र ऐन भरात असणाऱ्या लेखकांना तो मिळाला, तर त्यांच्याकडे समाजाचे लक्ष जाते, त्यांनाही पुढच्या वाटचालीसाठी हुरूप येतो. मुख्य पुरस्कार विजेते किरण गुरव, युवा पुरस्कार विजेते प्रणव सखदेव आणि बालसाहित्य पुरस्काराचे विजेते संजय वाघ हे सारे तरुण, सळसळत्या प्रतिभेचे लेखक आहेत, ही अतिशय आनंदाची बाब आहे. 'मराठीचा संसार' एकविसाव्या शतकात कसा चालणार, या शंकेचे काळेकुट्ट ढग वारंवार गर्दी करत असताना, मराठीत रसरसून साहित्य निर्मिती करणाऱ्या या तरुण लेखकांचा सन्मान होणे, याला एक सांस्कृतिक आणि सामाजिक अर्थ आहे. याशिवाय, नमिता गोखले या मराठी आडनाव असणाऱ्या लेखिकेला इंग्रजीचा पुरस्कार मिळाला आहे. त्यांचेही महाराष्ट्राशी विशिष्ट नाते आहे. किरण गुरव, प्रणव सखदेव आणि संजय वाघ यांच्या लेखनाचे विषय, त्यांची अभिव्यक्ती आणि त्यांची भाषाशैली पाहिली, तरी त्यातील ताजेपण, नावीन्य दिसून येईल. खरे तर, गुरव हे मराठी वाचकांना चांगले परिचित आहेत. त्यांची अनेक पुस्तके यापूर्वीही पुरस्कारप्राप्त ठरली आहेत; मात्र त्यांच्या लेखनातून दिसणारे एकविसाव्या शतकातील जग हे नवे घटित आहे आणि ते ताज्या दृष्टीशिवाय दिसणेही कठीण आहे. प्रणव सखदेव यांचा तर अधिकाधिक 'समकालीन लेखन' करण्यावरच भर असतो. संजय वाघ यांचे हे पुरस्कारप्राप्त पुस्तक एका आत्मविश्वास हरवलेल्या आणि अनेक आव्हाने समोर असणाऱ्या मुलाची गोष्ट आहे. 'जोकर बनला किंगमेकर' असेच या कादंबरीचे नाव आहे. मराठीतील बालसाहित्य किती वेगळ्या वाटेवरून जाऊ शकते, याचे हे पुस्तक म्हणजे आदर्श नमुना आहे. कालसंगत असणे, ते हेच आणि अशा समकाल-संगत लेखकांचे कौतुक केल्याबद्दल साहित्य अकादमीच्या मराठी पुरस्कारांसाठी बनविण्यात आलेल्या तज्ज्ञ समित्यांचे विशेष आभार मानायला हवेत.मराठी साहित्यात 'साठोत्तरी' साहित्याची फार चर्चा झाली. त्यानंतर, ती कशीबशी 'नव्वदोत्तरी'पर्यंत पुढे सरकली; मात्र १९९१चे उदारीकरण, त्यानंतर दशकभराने सुरू झालेले एकविसावे शतक आणि रोजच्या रोज नव्या धडका देत असणारी डिजिटल क्रांती, यांच्यामुळे साऱ्या समाजाचे; त्यातही तरुण पिढीचे जगणे प्रचंड मोठ्या आवर्तात सापडले आहे. हे आवर्त संजीवक आणि विनाशक असे दोन्ही असू शकते. त्याहीपलीकडे जाऊन ते नवनवे, आजवर कधीही न दिसलेले प्रश्न समोर फेकत आहे. या प्रश्नांना भिडून, त्यातून जगण्याचा अर्थ किंवा अनर्थ लेखनात आणणे, हे आव्हान आहे. हे तिन्ही लेखक हे आव्हान पेलत आहेत. या पुरस्कारांनी त्यांच्या पुढच्या वाटचालीला नवी उमेद येईल. 'थिंग्ज टू लीव्ह बिहाइंड' या इंग्रजी कादंबरीसाठी पुरस्कार मिळालेल्या नमिता गोखले या इंदिरा गांधी यांच्या मंत्रिमंडळातील कायदेमंत्री दिवंगत हरिभाऊ गोखले यांच्या स्नुषा आहेत. त्यांनी शिक्षण अर्धवट असताना, वयाच्या अवघ्या अठराव्या वर्षी राजीव गोखले यांच्याशी प्रेमविवाह केला आणि दोघांनी मिळून एक मासिकही सुरू केले. कुमाऊँ हिमालय या भागात बालपण गेलेल्या नमिता या हिमालय आणि तिथले लोकजीवन यांचे ताणेबाणे आपल्या लेखनातून उलगडत असतात. पुरस्कार मिळालेली कादंबरी ही त्यांच्या कादंबरीत्रयीतील शेवटची कलाकृती आहे. अलीकडे, त्या जयपूरच्या 'लिट फेस्ट'च्या संयोजक-समन्वयक म्हणून परिचित असल्या, तरी त्यांनी संपादन, अनुवाद, स्वतंत्र लेखन असे चौफेर काम केले आहे. 'माझी पाळेमुळे हिमालयाच्या कुशीतच रुजली आहेत; त्यामुळे लेखनात तो परिसर व लोकजीवन येणे स्वाभाविकच आहे,' असे नमिता म्हणतात. ते खरेच आहे. कोणताही अस्सल लेखक हा आपल्या मातीतूनच अक्षरबाग फुलवत असतो आणि सर्जनाची नवी आव्हानेही पेलत असतो. हे चारही लेखक असे आहेत.

# माथेरानमध्ये रक्तदान शिबिराला उत्तम प्रतिसाद



**दै.रायगड नगरी । माथेरान**

शहीद वीर हुतात्मा भाई कोतवाल व वीर हिराजी पाटील यांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधून रविवार, दिनांक ०२ जानेवारी रोजी शिवसेना शहर शाखा माथेरान व समर्पण ब्लड बँक,घाटकोपर यांच्या संयुक्त विद्यमाने व ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते व रक्तदाते राजाभाऊ कोठारी यांच्या सहकार्यातून रक्तदान शिबिर

शिवसेना जनसंपर्क कार्यालय येथे सकाळी १० वा. ते दुपारी ४ वाजेपर्यंत आयोजीत करण्यात आले त्यास नागरिकांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला. अनेक नागरिकांनी व रक्तदात्यांनी, सामाजिक बांधिलकी जपत स्वेच्छेने अन बहुसंख्येने उपस्थित राहुन ह्या महान कार्यास आपला हातभार लावून सामाजिक कर्तव्य निभवले त्याबद्दल शिवसेना , युवासेना, महिला आघाडीने सर्वांचे आभार मानले.

यावेळी माजी नगराध्यक्षा प्रेरणा सावंत,शिवसेना शहर प्रमुख चंद्रकांत चौधरी, माजी नगराध्यक्ष विवेक चौधरी, शिवसेना संपर्क प्रमुख प्रसाद सावंत,वन समिती अध्यक्ष योगेश जाधव, माजी नगरसेवक कुलदीप जाधव, माजी नगरसेविका सुषमा जाधव, सोनम दाभेकर, कीर्ती मोरे, ज्योती सोनावले,सरचिटणीस वसंत कदम, मनोहर रांजणे ,महत्त्वपपूर्ण कामासाठी सागर पाटील उपशहरप्रमुख,शिवसेना ,श्रेयस गायकवाड सचिव, युवासेना, निमेश मेहता युवाधिकारी, युवासेना, सचिन दाभेकर उपाध्यक्ष, क्षत्रिय मराठा समाज, माथेरान गौरंग वाघेला, अंकिता तोरणे,सुजाता कुंभार, उन्मेष दाभेकर, बंटी साबळे ,समीर पन्हाळकर यांनी विशेष परिश्रम घेतले.

विशेष म्हणजे या कार्यक्रमास नगरपरिषदेच्या सन्माननीय मुख्याधिकारी तथा उत्तम प्रशासक सुरेखा भणगे आणि त्यांचे पती यांनी हजेरी लावून रक्तदान सुध्दा केले आहे हे आजवरच्या इथल्या प्रशासकीय कारकिर्दीत प्रथमच पहावयास मिळाले आहे त्यामुळे भणगे दांम्पत्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# माथेरान मधील पक्षाची कार्यपद्धती खूपच समाधानकारक : रवींद्र मिर्लेकर

**दै.रायगड नगरी । माथोन**

सह्याद्रीच्या कुशीत वसलेल्या या सुंदर परंतु दुर्गम भागात अनेक लोकाभिमुख कामे पूर्ण करण्यासाठी ज्या सचोटीने आणि प्रामाणिकपणे प्रयत्न सुरू केले आहेत त्याचबरोबर लोकांची सुध्दा शिवसेनेकडे दिवसेंदिवस वाढता कल तसेच माथेरान मधील पक्षाची कार्यपद्धती,लोकांमधील पक्षाबाबतची सकारात्मकता पाहून खरोखरच समाधान होत आहे असे प्रतिपादन महाराष्ट्र शिवसेना समन्वयक रवींद्र मिर्ले कर यांनी व्यक्त केले नववर्षाच्या सुट्टीनिमित्ताने त्यांनी दोन दिवस सहकुटुंब माथेरानला सदिच्छा भेट दिली.



यावेळी त्यांचा शिवसेनेचे संपर्क प्रमुख प्रसाद सावंत यांच्या हस्ते शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.यावेळी जेष्ठ शिवसैनिक तथा उत्तम मार्गदर्शक सुभाष म्हसकर, संयुक्त वन समितीचे उपाध्यक्ष राजेंद्र कदम, दिलीप सकपाळ, विजय गंगाराम कदम, सिताराम शिंदे आदी उपस्थित होते. माथेरान मध्ये कधीच होऊ शकली नाही एवढी विकास कामे शिवसेनेच्या कमी कालावधीत पूर्ण झाली आहेत त्याचप्रमाणें पक्षवाढी आणि पक्षाच्या आगामी ध्येय धोरणाबाबतीत पक्षाच्या माध्यमातून मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांनी या गावासाठी भरीव निधी उपलब्ध करून दिल्यामुळे हे सहज शक्य झाले त्यामुळेच एवढी मोठी कामे मार्गी लागली आहेत अजूनही प्रस्ताव सादर केले असून २०२४ पर्यंत जवळपास संपूर्ण कामे पूर्णत्वास जाणार असल्याचे प्रसाद सावंत यांनी स्पष्ट केले.शिवसेना हा तळागाळापर्यंत पोहोचलेला एकमेव पक्ष आहे आणि इथली एकंदरीत भौगोलिक परिस्थिती लक्षात घेता आमच्या परीने नक्कीच सहकार्य राहील असे मिर्लेकर यांनी शेवटी नमूद केले.

# सहज निसर्ग शाळेतील विद्यार्थ्यांना दप्तरे वाटप व वैद्यकीय तपासणी

**दै.रायगड नगरी । खोपोली**

सहजसेवा फाऊंडेशन सातत्याने सातत्यपूर्ण व समाजास चालना देणारे उपक्रम राबवित असते. लोकसहभागातून समाजकार्य ही संस्थेची ओळख आहे.समाजातील विविध घटकांसाठी कार्यातील एक भाग म्हणून रविवार,१९ डिसेंबर २०२१ रोजी महड येथून सुरुवात झालेली वीट भट्टी कामगार व मजुरांच्या मुलांसाठी सुरू झालेला दर रविवारचा निसर्ग शाळा उपक्रम आता चळवळ होत आहे.समाजातील अनेक दानशूर उपेक्षित घटकांना शिक्षित करण्यासाठी सरसावले आहेत.



दिनांक ०२ जानेवारी २०२२ रोजी खोपो-लीतील सामाजिक कार्यकर्ते सतिश येरूणकर यांनी सामाजिक बांधिलकी जपून आपल्या वाढदिवसाच्या निमित्ताने शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांना दप्तर वाटप करण्याचा संकल्प पूर्ण केला तर वसंत देशमुख मेमोरिअल स्कूल, खोपोलीच्या वतीने विद्यार्थ्यांना खाऊ व शालेय वस्तूंचे वाटप केले याचवेळी वावोशी येथील श्री स्वामी समर्थ हॉस्पिटलच्या माध्यमातून डॉ.प्रदीप नथुराम पाटील यांनी मुलांची वैद्यकीय तपासणी केली.सामाजिक कार्यकर्ते अश-ोक ठकेकर, युवा पिढीतील आकाश राजेंद्र फक्के, ज्योती भुजबळ व रामसापीर सेवा मंडळ, खोपोली यांनी शैक्षणिक साहित्यासाठी सहकार्य केले.

वसंत देशमुख मेमोरिअल स्कूलच्या वतीने मुलांच्या बुद्धीला चालना देण्यासाठी काही खेळांचे सुद्धा आयोजन केले. नकुल देशमुख, इशिका शेलार, जयश्री भागेकर, अखिलेश पाटील व बी.निरंजन यांचे शिक्षकरूपात अमूल्य योगदान लाभत आहे. खालापूर तालुक्याचे तहसीलदार आयुब तांबोळी यांनी या उपक्रमाचे केलेले कौतुक व भविष्यातील सहकार्याचे मार्गदर्शन हा मैलाचा दगड ठरणार आहे. या वेळी अशोक ठकेकर, राजेंद्र फक्के, मोईन शेख, मोहन केदार, आकाश फक्के, रमेश पाटील, नरेश पालांडे, जयेश सुर्वे, सचिन शिंदे, संदेश माने तर वसंत देशमुख मेमोरिअल स्कूलच्या प्रशासकीय अधिकारी तेजस्वी देशमुख, मुख्याध्यापिका आश्विनी वाघुले, अर्चना सागळे, सुप्रिया सोरटे, स्मिता खेडकर यांची उपस्थिती होती.

आपल्या मुलांनीही नोकरी वा व्यवसायातून वेळ काढून समाजाप्रति आपले कर्तव्य पूर्ण केले पाहिजे, यासाठी स्वतः समाजकार्यात अग्रेसर राहून स्वतःचे पुत्र आकाश फक्के यांनाही सामाजिक सेवेत आणून समाजातील युवा पिढी पुढे एक आदर्श ठेवणारे राजेंद्र फक्के यांचेही सर्वत्र कौतुक होत आहे. या उपक्रमासाठी बहुमोल सहकार्य देणाऱ्या अझीम कर्जीकर व मा. नगरसेवक नितीन मोरे यांच्या विशेष सहकार्याने उपक्रमास चालना मिळत आहे.

सातत्यपूर्ण चालणाऱ्या या सहज निसर्ग शाळेत मनःपूर्वक योगदान देणाऱ्या सर्वांचे मनः पूर्वक आभार सहज सेवा फाऊंडेशन चे अध्यक्ष डॉ. शेखर जांभळे यांनी व्यक्त केले., तर सहज निसर्ग शाळेच्या माध्यमातून समाजातील उपेक्षित घटकांसाठी अजूनही बरेचसे उपक्रम राबविताना सहकार्याची भावना शीळफाटा येथील सामाजिक कार्यकर्ते मोईन शेख यांनी व्यक्त केल्या.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## ना.आदिती तटकरे यांच्या हस्ते उद्घाटन

पनवेल शहरातील तीर्थरूप नानासाहेब धर्माधिकारी उपजिल्हा रुग्णालयात डायलिसिस सेंटर सुरू करण्यास काही महिन्यापासून लागणारी उपकरणे देखील येथे बसवण्यात आलेली होती. परंतु तज्ञांची निवड करण्यात आली नसल्याने रुग्णांची गैरसोय होत होती. रायगड जिल्ह्यातून येथे उपचार घेण्यासाठी अनेक रुग्ण येत असतात. किडनी आणि मूत्रपिंडाच्या आजाराने त्रस्त रुग्णांना खासगी रुग्णालयात उपचार घेणे खर्चिक असल्याने जिल्ह्यातील रुग्ण दगावण्याची संख्यादेखील वाढत होत होती, त्यामुळे तातडीने संबंधित विभागास आदेश देऊन नानासाहेब धर्माधिकारी उपजिल्हा रुग्णालयात तज्ञांची निवड करून सेंटर सुरू करण्यात यावी अशी मागणी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांनी आरोग्यमंत्री आणि, राज्याच्या राज्यमंत्री व रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री आदिती तटकरे यांच्याकडे केली होती. त्यांच्या या मागणीला यश आले आहे. नवीन वर्षात डायलेसिस सेंटर सुरू होत असल्याने पनवेलकराना ही नववर्षाची भेट आहे. पनवेलचे डायलेसिस सेंटर सुरू होत असल्याने त्याचा लाभ गोर गरीब आणि गरजू नागरिकाना होणार आहे.

## आ.प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते भूमिपूजन

झाली आहे. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना ती मोफत उपलब्ध होऊ शकली आहे, असेही या वेळी त्यांनी सांगितले.

भूमिपूजन सोहळ्याच्या वेळी पनवेल महापालिकेचे नगरसेवक बबन मुकादम, भाजपचे तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, पनवेल पंचायत समितीचे उपसभापती वसंत काठावले, भाताण ग्रामपंचायतीचे सरपंच सुभाष भोईर, उपसरपंच केशव गायकर, सदस्य तानाजी पाटील, मनिषा जुमारे, मंदा ठाकूर, अस्मिता काठावले, रेश्मा भोईर, सुनील सते, तसेच किरण माळी, राजेंद्र पाटील, प्रिया मुकादम, अविनाश गाताडे, प्रवीण ठाकूर, प्रवीण खंडागळे, रामचंद्र पाटील, गुरुनाथ खारके, दत्तात्रेय पाटील, भरत पाटील, अनिल भोईर, सुभाष मुकादम, दिपक दुर्गे, रुपेश भोईर, समीर भोईर, अरुण म्हस्कर, स्वप्नील भोईर, गणेश जुमारे, चंदर भोईर, महेंद्र गोजे, महादेव पाटील, अनिल पाटील, महादेव कांबळे, राम हातमोडे, विकास जुमारे, संतोष करवले, कमलाकर भोईर, सुरेश भोईर, कमलाकर जुमारे, नामदेव पाटील, गणेश अगीवले, अनंता म्हामुणकर, अरुण पाटील, चंद्रकांत मुकादम, दीपक ठाकूर, अनिल काठावले, देविदास पाटील, वामन पाटील, दीपक जुमारे आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

## कार्यकर्त्यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात पक्ष प्रवेश

आदितीताई तटकरे यांच्या कार्य प्रणालीवर विश्वास ठेऊन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात पक्ष प्रवेश केला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस प्रशांत पाटील, महिला प्रदेश सरचिटणीस भावना घाणेकर, जिल्हा उपाध्यक्ष भार्गव पाटील, युवक जिल्हा उपाध्यक्ष समाधान म्हात्रे, जिल्हा सरचिटणीस -पुखराज सुतार, जिल्हा सरचिटणीस दिपक माळी, उरण विधानसभा अध्यक्ष वैजनाथ ठाकूर, जिल्हा परिषद सदस्य कुंदा ठाकूर, तालुकाध्यक्ष मनोज भगत, युवक तालुकाध्यक्ष कैलास भोईर, शहराध्यक्ष गणेश नलावडे आदी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

## पर्यटन आणि विकास वाढीच्या दृष्टीने उपयोगी ठरणारे : खा.सुनिल तटकरे

राऊत यांना तातडीने प्रस्ताव सादर करण्यात सांगितले. या कामी चालु आर्थिक वर्षात आवश्यक निधीची तरतूद करण्यात येणार असल्याचे सांगितले. या वेळी ग्रामस्थांनी गावातील कालभैरव मदिराचे वॉल कंपाउंड बांधकाम करण्यासाठी निवेदन देऊन निधीची मागणी केली असता त्या कामाला तातडीने मंजुरी देण्यात येणार असल्याची ग्वाही दिली. आयोजित कार्यक्रमात खासदार तटकरे यांनी सर्वांना नवीन वर्षाच्या शुभेच्छा देताना लोकांनी कोरोना प्रादुर्भाव कमी करण्यासाठी विशेष काळजी घ्यावी असे सुचित करताना हे वर्ष कोरोना मुक्तीचे जावो, सर्वांना सुखाचे, समृद्धी आणि आरोग्यदायी लाभो अशा शुभेच्छा दिल्या. म्हसळा तालुक्यातील रस्ते भूमिपूजनाचे आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात खासदार सुनील तटकरे यांच्या हस्ते वाघाव कलकीचाकोंड, वांगणी बोद्धवाडी येथे रस्ते बांधकाम भूमिपूजन, खामगाव येथे केपील क्रिकेट स्पर्धांचे उदघाटन, मोरवणे येथे विहीर बांधकामाचे भूमिपूजन केले.

# सर्पमित्र संदीप घरत यांनी दिले घोणस व नागाला जिवदान

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरुड मधील महावितरण कार्यालयाच्या आवारात आढळून आलेल्या घोणस व कोटेश्वरी मंदिराजवळ असलेल्या नागाला वनपरिक्षेत्र अधिकारी प्रशांत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सर्पमित्र संदीप घरत यांनी आपल्या कौशल्याने पकडून जवळील जंगलात सुरक्षित पणे सोडून जिवदान दिल्याने कौतुक व समाधान व्यक्त होत आहे.

शहरातील महावितरण कार्यालयाच्या आवारात कर्मचारी सिद्धेश भायदे याला एक सर्प आढळून आला.त्यांनी त्याचा फोटो काढून सर्पमित्र संदीप घरत यांना पाठविला व मोबाईल वर संपर्क साधून कळविण्यात आले. फोटो बघताच क्षणाचा विलंब न करता महावितरण कार्यालय गाठून संदीप घरत व वनरक्षक किरण जाधव यांनी त्या घोणस सापाला पकडले. नंतर कोटेश्वरी मंदिराजवळ एक सर्प आढळून आल्याचा फोन मनू मिसाळ यांनी संदीप घरत यांना केला असता संदीप घरत व वनरक्षक किरण जाधव कोटेश्वरी मंदिराजवळ असलेल्या फार्महाऊस जवळ पोहोचले व फार्महाऊस जवळील विहिरीलगत आढळून आलेल्या नागाला संदीप घरत यांनी आपल्या कौशल्याने पकडून वनविभागाचे वनपरिक्षेत्र अधिकारी प्रशांत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली वनरक्षक किरण जाधव यांच्या सहकार्याने जवळील जंगलात सुरक्षित पणे सोडून जिवदान दिल्याने कौतुक व समाधान व्यक्त केले जात आहे.

# विद्यार्थी उन्नती संघाने आदिवासी बांधवांना दिली मायेची उब : ५० जणांना ब्लँकेटचे वाटप

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

नागोठण्यातील कुंभारआळी येथे कार्यरत असलेली विद्यार्थी उन्नती संघ ही संस्था आणि प्रज्योती पुस्तक पेढी, जोगेश्वरी(मुंबई) यांच्या संयुक्त विद्यमाने नागोठण्याजवळील चिकणी(ता.रोहा) येथील आदिवासी वाडीवरील ५० आदिवासी बांधवाना उबदार ब्लँकेट्सचे वाटप नुकतेच करण्यात आले. अशाप्रकारे नागोठण्यातील विद्यार्थी उन्नती संघ व प्रज्योती पुस्तक पेढीने आदिवासी बांधवांना ऐन थंडीच्या मौसमात ब्लँकेटचे वाटप करुन मायेची उब दिल्याने त्यांचे सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे.

विद्यार्थी उन्नती संघ, नागोठणे (कुंभारआळी) आणि प्रज्योती पुस्तक पेढी जोगेश्वरी यांच्या संयुक्त विद्यमाने प्रज्योती पुस्तक पेढीचे संचालक राजेश सावंत आणि विद्यार्थी उन्नती संघ नागोठणेचे विद्यमान अध्यक्ष दीपक वाडेकर, कार्याध्यक्ष आनंद धाटावकर, सहसचिव सचिन वासकर, माजी अध्यक्ष कांचन वाडेकर आणि माजी सचिव मिलिंद धाटावकर व सदस्य शैलेश नागोठणेकर यांच्या शुभहस्ते चिकणी आदिवासी वाडीतील ५० आदिवासी बांधवांना या उबदार ब्लँकेटसचे वाटप करण्यात आले. त्यावेळी चिकणी येथील रहिवासी व सामाजिक कार्यकर्ते बाळकृष्ण देवरे हे देखील उपस्थित राहिले.

सध्या ऐन कडाक्याच्या थंडीच्या मोसमात आदिवासी बांधवांची अडचण ओळखून विद्यार्थी उन्नती संघातर्फे वाटप करण्यात आलेल्या या आवश्यक आणि अनमोल मदतीबद्दल सर्व आदिवासी बांधव व चिकणी येथील ग्रामस्थ यांनी खूप समाधान व्यक्त केले आणि विद्यार्थी उन्नती संघ व प्रज्योती पुस्तक पेढीच्या सर्व पदाधिकारी यांचे आभार व्यक्त केले.



हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

## संक्षिप्त...

# निसर्गाचा अद्भुत चमत्कार गरम पाण्याचे कुंड लाभलेले उन्हेरे गावाला पर्यटकांची बेहद पसंती

**दै.रायगड नगरी । धम्मशील सावंत**

**पाली/बेणसे** : सुधागड तालुक्यातील पर्यटनस्थळे , धार्मिक स्थळे जगभरात प्रसिद्ध आहेत. उन्हेरे गावाला निसर्गाचा अद्भुत चमत्कार लाभला आहे. येथील गरम पाण्याच्या कुंडांमुळे हे गाव सर्वत्र प्रसिद्ध आहे. तसेच येथे राजकीय, सामाजिक स्वातंत्र्य चळवळीच्या महत्वाच्या घटना देखील घडल्या आहेत.

रायगड जिल्ह्यात सुधागड तालुक्यातील उन्हेरे व महाड येथील सव येथे गरम पाण्याचे कुंड आहेत. त्यातील उन्हेरे येथील कुंडांना पर्यटक व नागरिकांची सर्वाधिक अधिक पसंत आहे. कारण या कुंडातील पाणी आंघोळीसाठी योग्य आणि स्वच्छ आहे. अंबा नदीच्या शेजारी निसर्गाने समृद्ध अशा ठिकाणी हे गरम पाण्याचे कुंड आहेत. उन्हेर कुंड परिसरात प्रसिद्ध विठ्ठल रखमाई मंदिर देखील आहे. तेथे मार्गशीर्ष शुद्ध पंचमी पासून पंधरा दिवस यात्रा भरते. सुक्या मासळीसाठी ही यात्रा प्रसिद्ध असून खास सुकी मासळी खरेदी करण्यासाठी हजारो भाविक व लोक येतात. आणि कुंडावर यथेच्छ स्थान देखील करतात. पालीपासून अडीच ते तीन किमी अंतरावर उन्हेरे गरम पाण्याचे कुंड आहेत. श्रीरामाने बाण मारून स्नानासाठी सीतामाईंना हे स्नान कुंड तयार करून दिली अशी याबाबतची पुराण कथा सांगितली जाते. उन्हेरे कुंडावर एकुण तीन कुंड आहेत. त्यातील एक कुंड थंड पाण्याचे आहे तर उर्वरित दोन कुंड गरम पाण्याचे आहेत. यापैकी थंड पाण्याचे व त्याच्या शेजारी असलेले गरम पाण्याचे कुंड उघड्यावर असून आकाराने लहान आहेत. येथील पाणी दुसऱ्या कुंडापेक्षा अधिक गरम आहे. तसेच हे कुंड खोल आहे. या कुंडात मधल्या भागात १.५ मीटर उंचीचा चौकोनी खड्डा आहे. येथे लोखंडी जाळी बसविण्यात आलेली आहे. आणि यातून सतत गरम पाणी येत राहते. या कुंडाच्या शेजारी लागूनच थंड पाण्याचे कुंड आहे. तर तिसरे गरम पाण्याचे कुंड मोठे असुन बंदिस्त आहे. त्यामध्ये महिला व पुरुषांसाठी दोन भाग केले आहेत. त्यांना खाली लाकडी फळ्या बसविण्यात आल्या आहेत. या फळ्यांच्या मधल्या अंतरातून गरम पाण्याचे बुडबुडे सतत येत राहिल्याने पाण्याची पातळी व गरमपणा कायम टिकून राहतो. उन्हेरे गावाजवळील या गंधक मिश्रित या कुंडात स्नान केल्यास त्वचेचे व वाताची विकार बरे होतात. येथे स्नान केल्यास ताजेतवाने वाटते. कामाचा व प्रवासाचा क्षीण देखील नाहीसा होतो. त्यामुळे सर्व ऋतूंमध्ये कुंडांवर स्नानासाठी लोक आलेली असतात. अशा ठिकाणी आढळणारे गरम पाणी हे भूगर्भातील हालचालींमुळे होत असते. लाव्हा रसाच्या उष्णतेमुळे भूगर्भातील खडक तप्त होतात व त्यांच्या संपर्कातील पाण्याचा साठाही गरम होतो. या जोडीलाच येथील भूगर्भात खनिजाच्या स्वरूपात असणारे क्षाररुपी गंधक झऱ्याच्या पाण्यात विरघळल्याने पाण्याचे तापमान वाढते आणि तेवर आल्यास त्यास गरम पाण्याचे झरे म्हणतात.

# समाजातील प्रत्येक घटक सक्षम बनला पाहिजे : अमित शेडगे

**दै.रायगड नगरी । गणेश प्रभाळे**

**दिघी** : दिघी – लोकशाहीमध्ये समाजातील प्रत्येक घटकाला समान हक्क प्रदान करण्यात आलेला आहे. समाजातील सामाजिक, आर्थिक विषमता दूर करण्याच्या हेतूने प्रशासकीय यंत्रणा सर्व शासकीय योजना तळागाळातील सर्वसामान्य व्यक्ती पर्यंत पोहोचण्यासाठी सदैव प्रयत्नशील आहे. समाजातील प्रत्येक घटक सक्षम बनला पाहिजे असे प्रतिपादन श्रीवर्धनचे प्रांत अधिकारी अमित शेडगे यांनी केले आहे.



श्रीवर्धन प्रांत कार्यालयाच्या सभागृहात कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण व स्वाभिमान योजना उपक्रमाअंतर्गत आयोजित कार्यक्रम प्रसंगी प्रांताधिकारी अमित शेडगे यांनी उपस्थित शेतकरी शेतमजूर व कर्मचाऱ्यांना संबोधित केले. सदरच्या कार्यक्रमासाठी तहसीलदार सचिन गोसावी, नायब तहसीलदार प्रज्ञा काकडे, उमेश लांगे, भीमशक्तीचे दीपक शिर्के आदी मान्यवर मंडळी उपस्थित होते.

शासन सर्वसामान्य व्यक्तींसाठी वेळोवेळी विविध योजना, उपक्रम राबवत असते. शासनाच्या विविध योजनांची अंमलबजावणी करण्याचे दायित्व प्रशासकीय यंत्रणेवर आहे. रायगड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी डॉक्टर महेंद्र कल्याणकर यांच्या निर्देशानुसार आज आपण विविध लाभार्थ्यांना विविध योजनांचा लाभ दिला आहे. समाजातील प्रत्येक घटकाचा उत्कर्ष होण्याच्या हेतूने शासन सर्वतोपरी प्रयत्नशील आहे. प्रत्येकाच्या हाताला काम मिळाले पाहिजे, रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या पाहिजेत, समाजातील आर्थिक विषमता नष्ट करण्याच्या दृष्टिकोनातून ग्रामीण भागातील भूमिहीन शेतमजूर यांना शासनाच्या माध्यमातून शेतजमीन उपलब्ध करून देण्यासाठी सर्वंकष प्रयत्न केले जा- तात. दारिद्र रेषेखालील भूमिहीन व्यक्तींना कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण व स्वाभिमान योजना अंतर्गत लाभ देण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. प्रशासकीय यंत्रणेच्या माध्यमातून समाजातील प्रत्येक घटकापर्यंत सकारात्मक विचार सकारात्मक कृती पोहोचली पाहिजे. आपणास सर्वांना देण्यात आलेल्या दाखल्यांचा निश्चितच चांगला उपयोग होईल असे प्रांत अधिकारी अमित शेडगे यांनी सांगितले आहे. कर्मवीर दाद- ासाहेब गायकवाड सबलीकरण व स्वाभिमान योजने अंतर्गत श्रीवर्धन तालुक्यातील ५७ व्यक्तींना भूमिहीन शेतमजूर,५९ व्यक्तींना उत्पन्न,५१ व्यक्तींना वय अधिवास असे विविध दाखले वाटप करण्यात आले.

# उरण नगरीचे शिल्पकार, माजी नगराध्यक्ष नगराज शेठ यांचे निधन

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण नगरीचे शिल्पकार,माजी नगराध्यक्ष नगराज शेठ (७८)यांचे काल सकाळी राहत्या घरी दुःखद निधन झाले. नगराज शेठ यांनी १९७४ साली नगराध्यक्षपदी निवड झाल्यानंतर शहराच्या विकासासाठी स्वताला झोकून दिले.शहरातील संपूर्ण विमला तलावाचे सुशोभिकरण करुन विकास कामांना गती दिली. अनधिकृत बांधकामांचे ते कर्दनकाळ म्हणूनही त्यांची प्रतिमा निर्माण झाली होती. त्यानंतर शहरातील रस्ते, पाणी पुरवठा, आरोग्य, स्वच्छता आदी कामांसाठी त्यांनी जातीने लक्ष दिले होते.२०११ पर्यंत मागील चार दशके त्यांनी नगरसेवक व मार्गदर्शक म्हणून काम केले.



इंग्रजीचे महत्व ओळखून तालुक्यातील मुलांसाठी इंग्रजी माध्यमाची युईएस शाळा सुरू केली.या शाळेचे ते फाउंडर संचालक म्हणूनही त्यांनी काम केले.उरण व्यापारी असोसिएशनचे अध्यक्षपदही त्यांनी भुषविले होते. नागाव-उरण येथील श्रीमत् परमहंस जीवनमुक्त स्वामी महाराज विरात्काश्रमाच्या अध्यक्षपदाची जबाबदारी सध्या त्यांच्यावर होती.उरणमधील समाजसेवी,दानशूर व्यक्तीमत्व काल वयाच्या ७८ व्या वर्षी हरपले.त्यांच्यावर बोरी येथील स्मशानभूमीत चाहत्यांच्या गराड्यात अखेरचा निरोप देऊन अंत्यसंस्कार करण्यात आले.

# म्हाडाचे घर मिळवून देण्याच्या आमिषातून ८.30 लाख उकळले

**दै.रायगड नगरी । पनवेल**

म्हाडाचे घर मिळवून देण्याचे आमिष दाखवून रेल्वेच्या निवृत्त कर्मचाऱ्याकडून ८ लाख ३० हजार रुपये उकळणाऱ्या संजय वानखेडे आणि त्याची मुलगी तेजस्विनी वानखेडे या दोघांविरोधात खारघर पोलिसांनी फसवणुकीसह अपहाराचा गुन्हा दाखल केला आहे.

सदर प्रकरणातील तक्रारदार शिखा शर्मा सध्या आई आणि लहान बहिण श्वेता शर्मा यांच्यासोबत खारघरमध्ये राहण्यास आहे. २०१७ मध्ये शिखाचे वडील विमलचंद्र शर्मा रेल्वेमध्ये कामाला असताना ते वुर्ला येथे राहण्यास होते. त्यावेळी ते स्वत:चे घर घेण्याच्या प्रयत्नात होते. त्यावेळी शर्मा यांची लहान मुलगी श्वेता शर्मा ज्या ठिकाणी कामाला होती, त्याच ठिकाणी आरोपी संजय वानखेडे याची मुलगी तेजस्विनी वानखेडे देखील कामाला होती. त्यावेळी श्वेताने नवीन घर विकत घेण्याच्या प्रयत्नात असल्याचे तेजस्विनीला सांगितले असता तिने तिचे वडील संजय वानखेडे म्हाडामध्ये मटेरियल सप्लायचे काम करत असल्याने त्यांची म्हाडा कार्यालयात तसेच मंत्रालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत चांगली ओळख आहे. त्यामुळे ते म्हाडाचे घर मिळवून देतील, असे श्वेताला सांगितले होते. त्यानंतर विमलचंद्र शर्मा यांनी संजय वानखेडे याला संपर्क साधला असता त्याने कुर्ला येथील घरी जाऊन म्हाडाच्या घरासाठी सुरुवातीला ८ लाख ३० हजार रुपये द्यावे लागतील, असे सांगितले होते. त्यामुळे विमलचंद्र शर्मा यांनी जून २०१७ मध्ये संजय वानखेडे याला खारघर मधील नातेवाईकांच्या घरामध्ये ८ लाख ३० हजार रुपये दिले होते. त्यानंतर डिसेंबर २०१८ उजाडल्यानंतर देखील वानखेडे याने शर्मा यांना म्हाडाचे घर मिळवून दिले नाही. त्यानंतर शर्मा निवृत्त झाल्यानंतर त्यांनी संजय वानखेडे याच्या मुलुंड येथील घरी अनेकवेळा जाऊन घर अथवा पैसे परत देण्याची मागणी केली. मात्र, वानखेडे याने वेगवेगळी कारणे सांगून वेगळ मारुन नेली. यादरम्यानच्या काळात एप्रिल महिन्यामध्ये शर्मा यांचा मृत्यू झाल्यानंतर त्यांच्या मुली शिखा आणि श्वेता यांनी वानखेडे याच्याकडे पैशांसाठी पाठपुरावा सुरु केला. त्यामुळे वानखेडे याने ४ लाख २० हजार रुपयांचे दोन चेक दिले. मात्र, ते बाऊन्स झाले. त्यानंतर देखील वानखेडे याने पैसे देण्यास टाळाटाळ केल्याने शिखा शर्मा हिने खारघर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.


मा.गोडसे साहेब
प्रो.जमा. ६-२५

अर्जदाराचे वकील
सत्यश्री महादेव गायकर
वकील उच्च न्यायालय

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज ५५/२०१९
नि.नं.२५/ड
ने.ता.०४/०१/२०२२

१) श्रीमती.चंद्राबाई त्रिंबक खारकर
वय : ७१ वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्री.अनंत त्रिंबक खारकर
वय : ५३ वर्षे, धंदा :
३) कै.विनोद त्रिंबक खारकर
(मयत तर्फे वारस)
३/१) श्रीमती.गुलाब विनोद खारकर
वय : ४० वर्षे, धंदा : गृहिणी
३/२) सौ.सायली सुरज ठाकूर
पुर्वाश्रमीची कु.सायली विनोद खारकर
वय : २१ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.उलवे, ता.पनवेल, जि.रायगड
३/३) सौ.श्वेता विशाल पाटील
पुर्वाश्रमीची कु.श्वेता विनोद खारकर
वय : २० वर्षे, धंदा : गृहिणी
रा.दहिवली, ता.पनवेल, जि.रायगड
३/४) कु.साक्षी विनोद खारकर
वय : १८ वर्षे, धंदा :
३/५) कु.सृष्टी विनोद खारकर
अर्जदार क्र.३/१ स्वतःकरिता व
अ.पा.क.आई म्हणून आई
अर्जदार क्र.३/५ करिता
अर्जदार क्र.१ ते ३/१, ३/४, ३/५
रा.उलवे, ता.पनवेल, जि.रायगड
४) श्री.सिकंदर त्रिंबक खारकर
वय : ४१ वर्षे, धंदा : नोकरी
रा.उलवे, ता.पनवेल, जि.रायगड
५) सौ.सरिता गणेश गवते
वय : ५० वर्षे, धंदा : गृहिणी
रा.नेरे, ता.पनवेल, जि.रायगड
६) कै.बाबुराव त्रिंबक खारकर
(मयत तर्फे वारस)
६/१) श्रीम.सुरेखा बाबुराव खारकर
वय : ५३ वर्षे, धंदा : गृहिणी
६/२) कु.साहिल बाबुराव खारकर
वय : २० वर्षे, धंदा :
अर्जदार क्र.६/१ व ६/२ व ६/४
रा.उलवे, ता.पनवेल, जि.रायगड
६/३) सौ.स्वप्नाली प्रवीण म्हात्रे
पुर्वाश्रमीची कु.स्वप्नाली बाबुराव खारकर
वय : २५ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.पिसार्वे, ता.पनवेल, जि.रायगड
६/४) श्रीमती.निशा बाबुराव खारकर
वय : ३१ वर्षे, धंदा : गृहिणी
६/५) सौ.अनिशा अशोक पाटील
पुर्वाश्रमीची कु.अनिशा बाबुराव खारकर
वय : ३२ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.बेलापूर, नवी मुंबई
६/६) सौ.सोनाली विश्वास म्हात्रे
पुर्वाश्रमीची कु.सोनाली बाबुराव खारकर
वय : २९ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

ज्याअर्थी कै.त्रिंबक नारायण खारकर रा.उलवे, ता.पनवेल, जि.रायगड हे दि.०४/०६/२०१८ रोजी मौजे : उलवे, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाले असून त्यांची आई कै.बयोबाई नारायण खारकर ही दि.३०/११/१९९३ रोजी मौजे : उलवे, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाली आहे. तसेच त्यांचा मुलगा कै.मयत बाबुराव त्रिंबक खारकर हा मौजे : उलवे, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झालेले आहेत. तसेच त्यांचा मुलगा कै.विनोद त्रिंबक खारकर हे दि.३०/०३/२०२० रोजी साईआस्था, प्लॉट नं.९०, रुम नं.२०४, सेक्टर २३, उलवे, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाले आहेत. कै.त्रिंबक नारायण खारकर यांचे नावे खालील वर्णनाची मिळकत आहे.

**जमीन मिळकतीचे वर्णन**
**गावाचे नाव उलवे**

| युनिट केस नं. | स.नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | सिडको फाईल नं. |
|---|---|---|---|---|
| ९०+९० चा क | ९३ | ९ | ०-०६-०० | |

कै.त्रिंबक नारायण खारकर यांस अर्जदार हे कायदेशीर वारसदार आहेत. सबब अर्जदार सदरचा अर्ज करीत आहेत. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब सदरचा वारस दाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाही असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

तारीख २०/१२/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**


# दुबई येथे झालेल्या विश्वचषक डायरेक्ट हॉलिबॉल स्पर्धेत भारतीय संघाने मिळविलेला विजय सांघिक : शरद कदम

**दै.रायगड नगरी । पेण**

डायरेक्ट व्हॉलिबॉल वर्ल्डकप स्पर्धेत भारतीय संघाने मिळविलेला विजय सांघिक असुन कर्णधार बिपीन चहल यांचा अनुभव व खेळांडुनी केलेला सराव व दुबई येथील भारतियांनी दिलेल्या पांठीब्याच्या जोरावर ही स्पर्धा जिकंली असुन या विजयामुले या खेळाला चालना मिळणार आसल्याचे संघ प्रशिक्षक शरद कदम यांनी सांगितले



दुबई येथे झालेल्या विश्वचषक डायरेक्ट हॉलीबॉल स्पर्धेत अंतिम फेरीत टांझानियाचा २१/६ व २१/३ असा पराभव करून भारताने अंतिम विजेतेपद पटकावले, भारतीय संघाचे प्रशिक्षक रायगड जिल्ह्यातील राष्ट्रीय प्रशिक्षक तथा राज्य क्रीडा संघटक शरद कदम हे होते.

भारतिय संघाने उपांन्त फेरीत कॅनडाचा पराभव करून अंतिम फेरीत प्रवेश केला. कॅनडाने भारतीय संघाला कडवी झुंज दिली. अंतिम फेरीत फुलचंदने नेट जवळून मारलेले बॉल विरुद्ध संघाला उचलताही येत नव्हते. त्याने प्रत्येक सामन्यात उत्तम खेळ केला तर सोयब बेगमपुरे यांच्या अप्रतिम सर्व्हिस शॉट तर यासिनने नेटमनची जबाबदारी उत्तम केली. कर्णधार बिपीन चहलने कोपऱ्यातून मारलेले बॉल व उपकर्णधार अंकुश पाठक यांने मिडलवरुन मार- लेले शॉट प्रेक्षकांची वाहवा मिळवत होते. चिंतन, धीरज, बिरजू, मलिक, वासू यांनीही उत्तम खेळ करुन विजयात भर टाकली. आसल्याचे शरद कदम यांनी सांगितले भारतीय संघाने विजय प्राप्त केल्याबद्दल क्रीडा, राजकीय क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन केले.

# जे.एम.म्हात्रे चॅरिटेबल ट्रस्ट तर्फे मसाले दुधाचा वाटप

**दै.रायगड नगरी । पनवेल**

३१ डिसेंबरच्या रात्री प्रत्येक जण आपल्या कुटुंबासमवेत, आपल्या मित्रमंडळीं समवेत सेलिब्रेशन करत असतो,

अशा वेळी आपल्या सेलिब्रेशनला कुठेही गालबोट लागू नये यासाठी आपल्या कुटुंबापासून दुर आपले कर्तव्य बजावणारे आपले महाराष्ट्र पोलीस बांधव यांच्यासाठी माझ्या जे. एम. चॅरिटेबल संस्थेचे सदस्य आणि शेतकरी कामगार पक्ष खांदा कॉलनी चे अध्यक्ष अनिल बंडगर, योगेश कोठेकर, सचिन मोकल, पंकज वाघ यांनी रात्री गस्तीवर असणाऱ्या आपल्या बांधवांसाठी या थंडीच्या दिवसात मसाले दूध देऊन थर्टी फर्स्ट सेलिब्रेशन केले.


जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था रायगड यांचे कार्यालय
शुक्रतारा बिल्डींग, कामतआळी, तळमजला, अक्षर बुक सेंटर शेजारी,
ता.अलिबाग, जि.रायगड
दूरध्वनी क्रमांक / फॅक्स क्र : ०२१४१-२२२०१३
ईमेल ddr_rgd@rediffmail.com
(महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री व्यवस्थापन हस्तांतरण त्यांचे नियमन करण्याबाबत)
अधिनियम १९६३ चे कलम ११ (३) अन्वये अर्ज
(अर्जदाराच्या नावे एकतर्फी मानवी अभिहस्तांतरण)
मालमत्तेचे मानिव अभिहस्तांतरण (डिम्ड कन्व्हेंयसबाबत) जाहीर नोटीस
बालाजी लाईफस्टाईल्स सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.
सुकापूर ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार
विरुद्ध
१) मे.बालाजी लाईफ स्टाईल्स तर्फे गैरअर्जदार
प्रोप्रा.आय्यज मोहम्मद अली काबाडी विकासक
पत्ता सुंदर प्लाझा अपार्टमेंट प.फ्लॅट नं.३
सनई मंगल कार्यालय, कल्याण जि.ठाणे
२) श्री.परेश लालचंद जोशी (जागा मालक)
३) श्री.जितेंद्र लालचंद जोशी (जागा मालक)
४) श्री.किशोर बी.गणात्रा व इतर
कार्या. पत्ता जे.के.ट्रेडर्स, १९१ जव्हेरी बाजार,
कपाडीया बिल्डींग, तिसरा मजला, मुंबई-४००००१

गैरअर्जदार यांना जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे कार्यालयात महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (मोफा) अधिनियम ११ अन्वये खालील मालमत्तेचे मानिव अभिहस्तांतरण करून मिळणेबाबत अर्ज केला आहे.

**मालमत्तेचे वर्णन**
**बालाजी लाईफस्टाईल्स सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. सुकापूर माथेरान रोड, गट नं.३१, हिस्सा नं.१, ता.पनवेल एकूण क्षेत्र २५०० चौ.मीटर पैकी ३६२.३८ चौ.मीटर जि.रायगड**

सर्व संबंधितांना आपले म्हणणे सादर करणेसाठी संधी मिळावी म्हणून या कार्यालयाने सुनावण्या घेतल्या आहेत. त्यामध्ये बालाजी लाईफस्टाईल्स सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.सुकापूर, ता.पनवेल तर्फे ॲण्ड एम.जी.खेरडे इतर सर्व गैरअर्जदार स्वतः किंवा प्राधिकृत प्रतिनिधी मार्फत अद्याप पर्यंत एकाही सुनावणीस उपस्थित राहिले नाहीत. त्यामुळे त्यांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी संधी मिळावी म्हणून दि.१७/०१/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता अंतिम सुनावणी निश्चित केली आहे. तसेच वरील मिळकतीबाबत ज्या कोणाचे हितसंबंध असतील त्यांनी प्रस्तावित कार्यवाहीबाबत त्यांचे म्हणणे दि.१७/०१/२०२२ पूर्वी या कार्यालयात दाखल करावे. तसेच निश्चित दिवशी व वेळी सुनावणीस आवश्यक त्या कागदपत्रांसह हजर रहावे, अन्यथा कोणाचीही काहीही हरकत नाही असे गृहीत धरुन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : १३/१२/२०२१

**सही/-**
**(डॉ.सोपान शिंदे)**
**सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, रायगड अलिबाग**


# सोनसाखळी चोर करणारी दोन विधीसंघर्षग्रस्त बालकांना पोलिसांनी घेतले ताब्यात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सोनसाखळी चोर करणारी दोन विधीसंघर्षग्रस्त बालकांना तुर्भे पोलीसानी ताब्यात घेतले आहे. त्यांच्या अटकेमुळे अनेक सोनसाखळी चोरीचे गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

तुर्भे पोलीस ठाणे गुन्हा नोंद कमांक ४३० / २०२१ भादवि कलम ३९२,३४ अन्वये यातील तक्रारदार हे कोडा कंपनी समोरील सर्व्हिस रोड , खैरणे एमआयडीसी येथुन स्काय वॉकचे दिशेनी घरी पायी चालत जात असताना त्याच सर्व्हिस रोडने समोरून काळ्या रंगाची मोटारसायकलवरून आलेल्या दोन इसमापैकी पाठीमागे बसलेल्या इसमाने तकारारदार यांचे गळ्यातील मंगळसूत्र जबरदस्तीने खेचुन चोरी केली होती सदर गुन्हयाचे अनुषंगाने सदर घटनास्थळाचे सी.सी.टी.व्ही फुटेजची पहाणी करून प्राप्त फुटेज च्या अधारे दोन विधीसंघर्षग्रस्त बालकांना कळवा, ठाणे येथुन ताब्यात घेतले सदर बालकांकडे गुन्हयाचे अनुषंगाने चौकशी केले असता क्रोडा कंपनी समोरील सर्व्हिस रोड, खैरणे एमआयडीसी येथुन गळयातील मंगळसूत्र जबरदस्तीने खेचुन चोरी केली असल्याचे निष्पन्न झाले आहे व यापुर्वी सुध्दा तुर्भे पोलीस पोलीस ठाणे हदीत अशा प्रकाराचे चेन जबरदस्तीने खेचुन चोरी केले आहे असे कबुल केले आहे. सदर गुन्हयात दोन विधीसंघर्षग्रस्त बालकांना ताब्यात घेतले आहे. विधीसंघर्षग्रस्त बालकांना मा. बालन्यालय येथे हजर राहण्याची तजबीज ठेवली आहे.

सदरची कारवाई पोलीस आयुक्त बिपीन कुमार सिंह, सह पोलीस आयुक्त डॉ.जय जाधव, अपर पोलीस आयुक्त महेश घुर्ये, पोलीस उप आयुक्त परि ०१ वाशी विवेक पानसरे, सहा. पोलीस आयुक्त गजानन राठोड, वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र आव्हाड, पोलीस निरीक्षक (गुन्हे) सुनिल कदम यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हेप्रकटीकरण पथकाचे सहा. पोलीस निरीक्षक प्रभाकर शऊरकर, पोना संतोष बड़े, पोना रोहीत राठोड, पोशि राजेश आघाव, पोशि भगवान लांडे, पोशि मनोहर जाधव, पोशि सुनिल गर्दनमारे, पोशि सुनिल सकट यांनी विषेश कामगीरी केली आहे.

# मोटार सायकल स्वाराचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । पन- वेल**

पनवेल जवळील पळ- स्पे परिसरात एका टँकरला पाठीमागून धडक दिल्याने झालेल्या अपघातात मोटार सायकल स्वाराचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.

पनवेल गोवा लेनवरुन अमलेशकुमार नगिनाप्रसाद (३३) हा त्याच्या ताब्यातील मोटार सायकल घेवून जात असताना पळस्पे ब्रीज खाली एका टँकरने अचानकपणे त्याच्या टँकरचा वेग कमी केल्याने अमलेशकुमार हा सदर टँकरला जावून धडकला. यात तो गंभीररित्या जखमी होवून त्यात त्याचा मृत्यू झाला आहे.

या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# संक्षिप्त...

## यशवंत नगर व आदिवासीवाडीच्या रस्त्यांसाठी शिवसेना शहर प्रमुख सुनील पाटील यांनी घेतला पुढाकार



**दै.रायगड नगरी । खोपोली**

खोपोली नगर परिषदेचा कार्यकाळ दि. ३० डिसेंबर २०२१ रोजी संपला. पण जनसेवेचा वारसा घेतलेले माजी नगराध्यक्ष तथा शिवसेना खोपोली शहर प्रमुख सुनील गोटीराम पाटील यांनी यशवंत नगर व प्रभाग क्रमांक १० च्या विकासाचा जो विडा उचलला आहे. त्यानुसार कार्यकाळ संपूनही त्यांनी विकासकामांचा धडाका सुरूच ठेवला आहे.

यशवंत नगर व आदिवासी वाडीतील जनतेला पुणे-मुंबई महामार्गाशी जोडणारा हक्कांचा रस्ता देण्यासाठी आज स्वत: पुढाकार घेत ते रस्त्यांच्या कामाला सरसावले. आज या रस्त्यांच्या कामाला सुरूवात झाल्यावर सुनील पाटील घटनास्थळी उपस्थित होते. त्यांनी ठेकेदार, आदिवासी वाडीतील रहिवासी, जेसीबी चालक, जागा मालक अस्लम खान, ठेकेदार व कार्यकर्त्यांना सूचना करीत काम मार्गी लावले.

यावेळी नगरसेवक वनिता हरिश काळे, बबन मुरकुटे, विजय कुंडले, फैय्याज कुरेशी, मदार सय्यद, शमीम शेख, निजाम शेख, पप्पू मासूम शेख, ढाकू वाघमारे, कॉन्ट्रैक्टर आसिफ शेख, बळीराम पवार, संतोष पवार, बबन रावजी मुरकुटे, अस्लम खान, अनिल डेंबानी, जमीर खान, फिरोज काझी, अभिजित पवार, चेतन दळवी व यशवंत नगर ग्रामस्थ आदी उपस्थित होते.

## मोटारसायकलीची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

शहरातील ठाणानाका येथील बलशंकर ऑटो गॅरेज येथे उभी करून ठेवलेली बजाज कंपनीची काळ्या रंगाची मोटारसायकल अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना घडली आहे.

सोमेश्वर पाटील (वय-२७) यांची दहा हजारांची बजाज कंपनीची काळ्या रंगाची पल्सर मोटारसायकल क्र.- एमएच ४६ व्ही ९२१० ही तेथे उभी करून ठेवली असता अज्ञात चोरट्यांनी सदर मोटारसायकल चोरून नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

# वर्षा अखेरीस कालवा सुरु मात्र उन्हाळी भातशेतीसाठी उदासिनता

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

वर्तमान पत्रातील बातम्यांचा परिणाम वर्षा अखेर कालवा सफाईला एकदाचा मुहुर्त सापडला आणि फक्त शहरातील एकाच ठिकाणी एका बाजुने का होईना, कालवा सफाई करण्यात आली, हे ही नसे थोडके, अस नागरिक उपहासाने बोलताहेत. शासनाची उदासिनता व बहुपयोगी कालव्याची ही अवस्था,त्याची निगा याकडे अक्षम्य दुर्लक्ष होत असल्याने कालव्याचे गटार झाल्याचे चित्र आपण सहजी पाहू शकतो. कालव्याच्या पाण्या-वर अलिकडे अपवाद वगळता कुणी शेतीच करत नाही. सगळे काटानं लावतात म्हणजे कडधान्य भाजीपाल्याची शेती करतात. अवकाळी पावसाने यंदा तिचेही प्रचंड नुकसान झाले आहे. तालुक्यातुन उन्हाळी भातशेती जवळपास संपली असल्याचे चित्र आहे.



भातशेतीच कोठार समजला जाणारा आपला रायगड आणि त्याची ही अवस्था, उदासिनता याला म्हणावं तरी काय ? अलिकडे शेतीच्या कामाला माणसच मिळत नाहीत. शेती करणे परवडत नाही. त्यात नैसर्गिक आपत्ती मुळे बळीराजा हैराण आहे. आता कालव्याचा उपयोग आपल्याकडे फक्त लोकांना पिण्यापुरते पाणी मिळावे यासाठीच कालव्याचे पाणी नदीत सोडून पातळी वाढविण्यापुर्ताच राहिला काय ? असा सवाल ऐरणीवर आला आहे. कालवा काळ प्रकल्प बंद पडत चालला आहे. हळू हळू हा प्रकल्प येथुन मराठवाड्यात जाणार कि काय? अशीही चर्चा लोक करतात.

म्हणुनच पाठबंधारे काळ प्रकल्पातील नोकरभरती बंद झाली. सेवानिवृत्ती नंतर पुन्हा माणस भरलीच नाहीत. जो कालवा पूर्वी कामाला माणस लावून संपूर्णपणे साफ केला जायचा, त्याची डागडुजी निगा राखली जायची, आता तीच सफाई यांत्रीकपणे अर्धवट उरकतात. संबंधित शासनाने या गोष्टींचा गांभीर्याने विचार करावा अशी वेळ आली आहे.

जर बहुपयोगी कालवा दुर्लक्षित झाला तर भविष्यात येथिल शेतकरी गोरगरीब जनतेला पाणीटंचाई सारख्या गंभीर समस्यांना सामोरे जावे लागुन इतरांवर अवलंबुन विकतच महागड अन्नधान्य आणुन खावे लागेल. अशी भितीही लोक व्यक्त करतात.

तत्कालिन दूरदृष्टी असलेल्या लोक प्रतिनीधींच्या महत् प्रयासाने अथक प्रयत्नांतुन शतकातून एखादी बहुपयोगी कालवा योजना आणली गेली. तिची ही अवस्था; कोकणचे भाग्यविधाते यांनी तसेच आताच्या शासनकर्त्यांनी लक्षात घ्यावी, अशी जनतेची अपेक्षा आहे. एकेकाळी काळप्रकल्प पाठबंधारे वसाहतीला किती महत्व होत हे माणगांवकरांनी पाहिल आहे. आज त्याची काय अवस्था झाली आहे ? विकास होतच राहील पण तो सर्वांगिण असावा. असलेले वैभव घालवुन नेमके आपण काय साधणार असा सवालही ऐरणीवर आलाय.

# तळोजा कारागृहात कैद्यांच्या दोन गटांत हाणामारी एक गंभीर जखमी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तळोजा येथील कारागृहात बंदिस्त असलेल्या कैद्यांच्या दोन गटांत गुरुवारी सकाळी तुंबळ हाणामारी झाल्याची घटना घडली. या हाणामारीत एक कैदी गंभीर जखमी झाला आहे. त्याला उपचारार्थ मुंबईतील जेजे रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या घटनेनंतर खारघर पोलिसांनी हाणामारी करणाऱ्या सात कैद्यांविरोधात हाणामारी करणे, दंगल माजविणे अशा कलमाखाली गुन्हे दाखल केले आहेत.

सकाळी साडेदहाच्या सुमारास तळोजा कारागृहातील तळमजल्यावरील तीन क्रमांकाच्या बराकीत बंदिस्त असलेला कैदी फैय्याज खालीद शेख याला वरच्या मजल्यावरील (कक्ष-२) कैदी अर्जुन काशीनाथ सांवत याने किरकोळ कारणावरून बॅरेकच्या व्हरांड्यातून शिवीगाळ करण्यास सुरुवात केली होती. त्यामुळे फैय्याज शेख यानेही त्याला शिवीगाळ केली. त्यानंतर अर्जुनने खालच्या मजल्यावर येऊन कैदी विजय सीताराम शिंदे, रेहमतुल्ला शफिक शेख उर्फ निराला आणि सुनील उर्फ चिनू वाल्मिकी यांना सोबत घेऊन फैय्याजला बेदम मारहाण केली. त्यामुळे बॅरेक क्रमांक-३ मधील कैदी इब्राहिम माजीद दिवाण व अक्षय संजय जावळे हे दोघे फैय्याज शेख याच्या बाजुने भांडण्यास आल्याने अर्जुन सावंत याने साफसफाईसाठी असलेल्या पुसणीच्या फ्लास्टीक दांड्याने फैय्याज याच्या तोंडावर मारले, तसेच त्याच्या बाजुने भांडण्यासाठी आलेल्या कैद्यांसोबत मारामारी सुरू केली. या हाणामारीत दोन्ही गटांतील कैद्यांनी ऐकमेकांचे डोके भिंतीवर व लोखंडी दरवाज्यावर आपटल्याने ते जखमी झाले. याबाबतची माहिती त्याठिकाणी कर्तव्यावर असलेल्या कर्मचाऱ्यांनी तुरुंग अधिकारी लोकरे यांना दिल्यानंतर त्यांनी तत्काळ सदर ठिकाणी धाव घेऊन कैद्यांना ताब्यात घेतले.

# नववर्षाच्या सुरूवातीलाच शेकडो जणांचा शिवसेनेत जाहीर प्रवेश



**दै.रायगड नगरी । पनवेल**

शिवसेना पक्षप्रमुख तथा महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री उद्धव बाळासाहेब ठाकरे व युवसेनाप्रमुख तथा राज्याचे पर्यावरण पर्यटन व राज्यशिष्टाचार मंत्री (महाराष्ट्र राज्य) आदित्य ठाकरे यांच्या कार्यप्रणालीवर प्रेरित होऊन व शिवसेना जिल्हाप्रमुख रायगड शिरीष घरत यांच्या नेतृत्वाखाली तसेच पनवेल तालुका संपर्कप्रमुख योगेश तांडेल यांच्या विशेष प्रयत्नाने, वारदोली व मोह येथील, मयूर भोपी, शरद म्हात्रे, किरण भोपी, रवी भोपी, अनंता पाटील, धोंडूराम भोपी, हिरू भोपी, राम भोपी, रोशन कडव यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी हाती शिवबंधन बांधून शिवसेना पक्षात जाहीर पक्ष प्रवेश केला.

त्याप्रसंगी शिवसेना तालुका संघटक भरत पाटील, पनवेल ग्रामीण तालुका प्रमुख ज्ञानेश्वर बडे, उपतालुका प्रमूख नरेश पाटील, नवीन पनवेल शहरप्रमुख यतीन देशमुख, उपशहर प्रमुख ज्ञानेश्वर भंडारी, विभाग प्रमुख मनेश पाटील, उपविभाग प्रमुख अनिल तळवणेकर शिवसैनिक अरुण पाटील आदि पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नववर्ष स्वागत कार्यक्रमांच्या पार्श्वभूमीवर पनवेल महापालिकेच्या भरारी पथकांची जोरदार कारवाई

**दै.रायगड नगरी । पनवेल**

राज्यासह पालिका क्षेत्रात कोराना रूग्ण संख्या वाढू लागल्याने शासनाने पुन्हा कठोर निर्बंध लागू गेले आहेत. नववर्ष स्वागताच्या निमित्ताने आयोजित केल्या जाणाऱ्या कार्यक्रमांबरोबरच विना मास्क फिरणाऱ्या आणि रात्री ९ नंतर जमावबंदीचे आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या नागरिकांवर, कोरोना नियमांचे उल्लंघन करणाऱ्यां आस्थापनांवर कारवाई करण्यासाठी पालिका प्रशासनाच्या भरारी पथकाबरोबर आयुक्त गणेश देशमुख यांनी स्वत: रस्त्यांवर उतरले होते. त्यांच्याबरोबर उपायुक्त विठ्ठल डाके, उपायुक्त सचिन पवार, सहाय्यक आयुक्त वंदना गुळवेही होत्या. महापालिका क्षेत्रातील खारघर, कळंबोली, कामोठे,पनवेल, अशा चारही प्रभागात आयुक्तांनी स्वतः जाऊन दंडात्मक कारवाई केली.

यावेळी ठरवून दिलेल्या आसनक्षमते पेक्षा जास्त गर्दी असलेल्या आस्थापना,तसेच ठरवून दिलेल्या वेळेनंतरही आस्थापना सुरू ठेवणाऱ्यांवर पालिकेच्या भरारी पथकाच्यावतीने कारवाई करण्यात आली. सार्वजनिक ठिकाणी गर्दी करणाऱ्या आणि मुखपट्टीचा वापर करीत नसलेल्या नागरिकांवरही दंडात्मक कारवाई करण्यात आली. नवीनवर्षाच्या स्वागतासाठी आयोजित करण्यात आलेले कार्यक्रम मर्यादित प्रमाणात करण्याच्या सूचना आयुक्तांनी २९ डिसेंबरला झालेल्या बैठकित दिल्या होत्या. सध्या ओमिक्रॉन विषाणू प्रजातीचे संक्रमण सामान्य नागरिकांमध्ये फार मोठ्या प्रमाणात पसरण्याची दाट शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी आरोग्याच्या दृष्टीने खबरदारी म्हणून मोठ्या प्रमाणात एकत्र न येता या वर्षी ३१ डिसेंबर, २०२१ (वर्ष अखेर) व नूतन वर्ष २०२२ चे स्वागत अत्यंत साधेपणाने करण्याच्या सूचना नागरिकांना देण्यात आल्या होत्या. तसेच राज्य शासनानच्या नव्या निर्देशानुसार विवाह सोहळ्याबरोबरच कोणत्याही सभारंभात फक्त ५० जणांनाच परवानगी देण्यात आली आहे. नववर्षानिमित्त हॉटेल,रेस्टॉरंटमध्ये आयोजित केल्या जाणाऱ्या कार्यक्रमांमध्ये करोना नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी प्रत्येक प्रभागामध्ये ५० अधिकारी- कर्मचाऱ्यांची भरारी पथके गेल्या दोन तीन दिवसापासून तैनात करण्यात आली. त्यांच्या माध्यमातून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई केली जात आहे. हुल्लडबाजी करणाऱ्यांवर या पथकाची करडी नजर ठेवून होते. शहरातील मोकळ्या जागी तसेच सार्वजनिक ठिकाणीही या पथकांमार्फत कारवाई करण्यात आली. त्याचबरोबर प्रमुख ठिकाणांसह बाज-ारपेठ परिसरात रात्री ९ वाजेनंतर गर्दी होणार नाही याची दक्षता पालिकेच्या भरारी पथकाने घेतली.

# कामगारांच्या विविध समस्ये संदर्भात खा.श्रीरंग बारणे यांनी घेतली केंद्रीय मंत्री सर्बानंद सोनोवाल यांची भेट

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण मध्ये असलेल्या जे.एन.पी.टी बंदरांतर्गत असलेल्या भारतातील पहिल्या प्रायव्हेट पोर्ट एन.एस.आय.सी.टी (डी. पी वर्ल्ड) पोर्ट मधील सेवानिवृत्त कामगारांच्या विविध समस्यान बाबत केंद्रीय जल परिवहन मंत्री सर्बानंद सोनोवाल यांच्या समवेत खासदार श्रीरंग आप्पा बारणे, कामगार प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत परिवहन भवन, दिल्ली येथे बैठक झाली.

एन.एस.आय.सी.टी (डी. पी वर्ल्ड) पोर्ट मधील सेवानिवृत्त कर्मचारी हे सदर पोर्ट व्यस्थापनाच्या मनमानी कारभार व हुकूमशाही मुळे हक्काच्या ६.९.१ ह्या अटीचे काटेकोर पालन न झाल्यामुळे लाचारीचे जीवन जगत असून त्याची दखल श्रीरंग आप्पा बारणे यांनी घेतली व त्यासंदर्भात सविस्तर निवेदन केंद्रीय जल परिवहन मंत्री माननीय श्री. सर्बानंद सोनोवाल यांना दिले आहे.

या बाबत सविस्तर चर्चा करण्यात आली व सध्याच्या परिस्थितीची माहिती मंत्री महोदयांना देण्यात आली, या बाबत सकारात्मक निर्णय घेतला जाईल असे मंत्री महोदयांनी सुचित केले. यावेळी श्रीरंग आप्पा बारणे यांच्यासमवेत कामगार नेते महेंद्र सावंत, करंजा मच्छिमार सहकारी सोसायटी संचालक हेमंत गौरीकर व एन.एस.आय.सी.टी (डी. पी वर्ल्ड) पोर्ट सेवानिवृत्त कामगारांचे नेते धनराज पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.



सदर समस्या बाबत गप्प न बसता आता एन.एस.आय.सी.टी (डी. पी वर्ल्ड) पोर्ट मधील सेवानिवृत्त कामगार मयुरेश पाटील व भास्कर पाटील - जासई, जि. के ठाकूर - न्हावा खाडी, दयाराम कडू - सोनारी, प्रकाश म्हात्रे - नवीन शेवा यांच्या नेतृत्वाखाली एकत्र आले आहेत व आपल्या रास्त व योग्या मागण्यांसाठी व सेवानिवृत्तीचे जीवन मनाने व अभिमानाने जगण्यासाठी संघर्ष करून हक्क मिळवण्यासाठी एकत्रित संघर्ष करणार आहेत.या समस्या बाबत आवाज उठविल्याने सर्व कामगारांनी खासदार श्रीरंग बारणे यांचे आभार मानले आहेत .

# बोर्ली स्थानकालगत अतिक्रमणावर शासनाची कारवाई : स्थगित न्यायप्रविष्ट अतिक्रमण वगळता हटविले अतिक्रमण

**दै.रायगड नगरी । राजीव नेवासेकर**

**कोर्लई** : मुरुड तालुक्यातील बोर्ली ग्रामपंचायत हद्दीतील एस टी स्थानकालगत गट नं.६५ मधील सरकारी जागेतील अतिक्रमण स्थगित असलेले न्यायप्रविष्ट व्यक्तींचे अतिक्रमण वगळता अन्य अतिक्रमण तहसीलदार गोविंद वाकडे यांच्या उपस्थितीत हटविण्यात आले.



बोर्ली स्थानकावर सरकारी जा-गेवर जी अतिक्रमणे झालेली आहेत ती हटविण्यात यावीत अशी मागणी वनीता पाटील यांनी केली होती.हा वाद जिल्हा न्यायालयात ही सुरू होता.परंतु न्यायालयात महसूल खात्याला प्रतिवादी बनविण्यात आले नव्हते. त्यामुळे सद-रची जागा शासनाने स्वत:च्या ताब्यात घ्यावी.असा निर्णय लोकायुक्त यांनी दिला तसेच त्यानुसार कारवाईचे आदेश लोकायुक्तांनी दिल्याने तहसील विभागाने कारवाई करीत बोर्ली स्थानकालगत स्थगित न्यायप्रविष्ट अतिक्रमण वगळता गट नं.६५ या सरकारी जागेवर कारवाई करीत अतिक्रमण हटविण्यात आले. तहसीलदार गोविंद वाकडे,नायब तह-सीलदार रवींद्र सानप, मंडळ अधिकारी लक्ष्मण शेळके, तलाठी अमृत चोगले,, पोलीस अधिकारी अशोकराव थोरात, रेवदंडा पोलीस व पोलीस हवालदार कवळे, ठाकूर तसेच महावितरण कर्मचारी या कारवाईत सहभागी झाले होते. दिव-ाणी न्यायालयाच्या अंतिम निर्णयानुसार उर्वरित अतिक्रमण देखील हटविण्यात येणार असल्याचे तहसीलदार गोविंद वाकडे यांनी यावेळी सांगितले.

# माथेरानच्या वन ट्री हील पॉईंटला आलाय नवा लूक

**दै.रायगड नगरी । मुकूंद रांजाणे**

**माथेरान** : माथेरान मधील अनेक विकास कामे मार्गी लावण्यासाठी प्रयत्न केले जात असतानाच जे मुख्य पाहण्याजोगे नयनरम्य पॉईंट्स आहेत की ज्यावरून निसर्गाच्या अदभुत लीलया अगदी सहजपणे पहाता येतील अशा केवळ दूर असणाऱ्या या पॉईंट वर काही वर्षांपासून येथील बहुतांश घोडेवाले आणि हातरीक्षा वाले जाण्यासाठी नेहमीच टाळाटाळ करतात. अगदी जवळचे स्वयंघोषित पॉईंट दाखवून पर्यटकांची दिशाभूल आणि अव्वाच्या सव्वा रक्कम लाटण्यात अनेकांचा हातखंडा बनलेला आहे.

त्यामुळे अशा अनेक सुंदर पॉईंट वरील स्टॉल धारकांना पर्यटकांअभावी अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यांच्या व्यवसायावर मोठया प्रमाणावर विपरीत परिणाम झालेला आहे. याकामी अशा पॉईंटसचे सुधारीकरणं आणि सुशोभीकरण नगरपरिषद आणि एमएमआरडीएच्या माध्यमातून करण्यात आलेले आहे.यातील एक ऐतिहासिक वारसा लाभलेल्या वन ट्री हील पॉईंटला नवसंजीवनी देण्यात आली असून ह्या एका नयनरम्य पॉईंटला इतिहासजमा होण्यापासून संरक्षण मिळाले आहे.ह्या पॉईंटच्या भागात दगडगोटे आणि आजूबाजूच्या परिसरातील भाग अत्यंत खडकाळ होता त्याजागी आता जांभ्या दगडात आकर्षक रस्ता आणि दोहोबाजुला लोखंडी संरक्षक रेलिंग लावण्यात आली आहे.त्यामुळे अगदी जवळ जाऊन पॉईंटचा तळ सुध्दा पाहण्यात एक वेगळाच अनुभव याठिकाणी अनुभवायला मिळत आहे. समोर पनवेल येथील बहुतांश भाग तसेच शिवकालीन प्रबळ किल्ला, मोरबे धरण या पॉईंट वरुन अगदीच जवळ असल्याचा भास होतो याठिकाणी पर्यटकांना विश्रांती साठी हेरिटेज पध्दतीने दगडाचे बाकडे बनविले आहेत. रुंद पायऱ्या त्याचप्रमाणे झाडांना संरक्षक कठडे, कचराकुंडी यामुळे या पॉईंटचा कायापालट झालेला असल्याने तेथील व्यावसायिकांच्या व्यवसायाला लवकरच तेजी प्राप्त होणार आहे. त्यामुळे निदान ह्या नयनरम्य पॉईंटचे देखावे पर्यटकांना पाहता यावेत जेणेकरून खऱ्या अर्थाने निसर्गाच्या सानिध्यात आल्याचा एक वेगळाच आनंद पर्यटकांना उपभोगता येऊ शकतो याकामी यापुढे तरी घोडेवाले, रिक्षावाले यांनी इमानेइतबारे नकाशावर ठळक असणारे पॉईंट पर्यटकांना दाखवावेत अशी अपेक्षा येथील सर्वच पॉईंट वरील स्टॉल धारक करीत आहेत. या पॉईंटच्या कामांवर विरोधी पक्षनेते शिवाजी शिंदेंनी बारकाईने लक्ष केंद्रित करून उत्तम प्रकारे काम करुन घेतले आहे.

